# सामूहिक सुरक्षितता
# Collective security

## प्रस्तावना
## introduction

Edit with WPS Office

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये जागतिक स्तरावर शांतता निर्माण करण्यासाठी अनेक धोरणांचा अवलंब केला जातो.

१) आपल्या लष्करी सामर्थ्यात वाढ
२) परस्पर सहकार्याचे धोरण
३) विश्व राज्याची कल्पना
४) सामूहिक सुरक्षितता

Edit with WPS Office

जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करणाऱ्या सर्व उपलब्ध मार्गांमध्ये सामूहिक सुरक्षितता हा अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. सामूहिक सुरक्षते द्वारे आक्रमकतेला युद्धाला थोपवले जाते सामूहिक सुरक्षितता सत्ता संतुलन असलेला एक आवश्यक मार्ग म्हणावा लागेल ज्याद्वारे जगात शांतता निर्माण करून टिकवली जाते.

Edit with WPS Office

सामुहिक सुरक्षिततेचा प्रथमता विचार एकोणिसाव्या शतकात विल्यम पेन व पिलियम पेट यांनी मांडला. परंतु या संकल्पनेचा खऱ्या अर्थाने वापर विसाव्या शतकात पहिल्या महायुद्धाच्या काळात झाल्याचे दिसते. अठराव्या व विसाव्या शतकापर्यंत राष्ट्र संरक्षणासाठी अनेकदा सत्तेचे धोरण किंवा एकाकीपणाची धोरण स्वीकारले जात. दोन देशात वाद संघर्ष असेल तर दोनच राजे आपसा मध्ये लढत बाकी राज्य या संघर्षात तटस्थतेची भूमिका घेतात .

Edit with WPS Office

राज्य एकाकी पडत असत .त्यामुळे त्याकाळी युध्दाचे स्थानिकरण शक्य झाले होते ,असे केनेथ डब्ल्यू थाम्सन म्हणतो. विसाव्या शतकामध्ये जागतिक परिस्थिती बदलली तांत्रिक क्रांतीने आंतराष्ट्रीय संबंधाचे संदर्भ बदलले दळणवळणाच्या साधनांत वेगाने सुधारणा झाल्याने देशा देशातील अंतर कमी झाले शिवाय राज्यांची परस्परावलंबिता वाढली . कोठेही संघर्ष, वाद झाला की त्याचा परिणाम कमी अधिक प्रमाणात सर्वत्र होईल अशी विचारसरणी पुढे आली .अशा संघटित प्रयत्न साठी एखादी प्रयत्न करण्याची निकड वाटू लागली यातूनच सामूहिक सुरक्षितता ही संकल्पना पुढे आली.

Edit with WPS Office